महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/३६/र.वका.(८३००)शा.नि.-अधिसूचना/०७/२०२५, मुंबई, दि. ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ:-** महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२५/प्र.क्र.३६३/ मासैक,दि. १५/१२/२०२५

**विषय:-** जिल्हा सैनिक मंडळ समिती व जिल्हा स्तरीय ध्वजदिन निधी संकलन समिती यांचे एकत्रिकरण करुन पुनर्रचना करणेबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२५/प्र.क्र.३६३/मासैक दि.१५/१२/२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५१२१५१७२४३८२७०७ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
CHANDRASHEKHAR GOVINDRAO SHINDE
Date: 16-12-2025 15:48:56

( चंद्रशेखर शिंदे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का) (अति.कार्यभार )
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई. (सस्नेह)
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई(सस्नेह).
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक,(आस्थापना/कायदा व सुव्यवस्था /आर्थिक गुन्हे/दहशतवाद विरोधी पथक/ विशेष कृती/ प्रशासन/ वाहतूक/ प्रशिक्षण व खास पथके / फोर्स वन नागरी हक्क संरक्षण/ सायबर सुरक्षा / रा.रा.पो.बल / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सह)
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
पोलीस महानिरीक्षक, (नियोजन व समन्वय) , महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ मोटर परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान, नागपूर.

विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना/ कायदा व सुव्यवस्था/ प्रशासन/ प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.

विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.

संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे.

सर्व पोलीस अधीक्षक ( गुन्हे/ बिनतारी संदेश/लोहमार्ग).

पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.

प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.

सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र.

सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९.

सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता/ धोरण/ नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.

सर्व कार्यासन अधिकारी, का क्र.१ ते ४४

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**जिल्हा सैनिक मंडळ समिती व जिल्हा स्तरीय ध्वजदिन निधी संकलन समिती यांचे एकत्रिकरण करुन पुनर्रचना करणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय, क्र: संकीर्ण-२०२५/प्र.क्र.३६३/मासैक**

मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक: १५ डिसेंबर, २०२५

वाचा- १) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसएसबी १०८३/२८९६/ सीआर-३७८/८४ /२८, दिनांक १७ जुन १९८६.
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. मासैक-२०२४/प्र.क्र.२०४/का-मासैक, दिनांक १०.१२.२०२४
३) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक: कार्यशा-२०२५/प्र.क्र.०६/म-८, दिनांक ०९ एप्रिल, २०२५
४) विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग यांच्य अध्यक्षतेखाली गठीत समितीने केलेल्या शिफारशी दिनांक ०९.०७.२०२५

**प्रस्तावना-**

माजी सैनिकांच्या तक्रारी /अडचणीचे निवारण करण्यासाठी संदर्भाधीन क्र.१ दिनांक १७.०६.१९८६ रोजीच्या शासन निर्णयान्वये जिल्हा सैनिक मंडळ समिती गठीत केली आहे. तसेच माजी सैनिकांच्या पुनर्वसनाच्या विविध कल्याणकारी योजना राबविण्याकरता आवश्यक असणाऱ्या ध्वजदिन निधी संकलन नियोजन / समन्वयाकरिता संदर्भीय क्र.२ अन्वये जिल्हास्तरीय ध्वजदिन निधी संकलन समिती गठीत करण्यात आली आहे.

२. महसूल व वन विभागामार्फत विविध प्रशासकीय विभागाच्या माध्यमातून क्षेत्रीय स्तरावर हाताळत येणाऱ्या विविध विषयाच्या अनुषंगाने प्रशासनाच्या विविध स्तरावरील विद्यमान कार्यपध्दती, योजनांची प्रभावितता, कामकाजातील कार्यक्षमतेचे मुल्यांकन, माहिती व्यवस्थापन प्रणाली इ. चा सखोल अभ्यास करुन सुधारीत उपाययोजना व शिफारशी करण्याकरिता संदर्भीय क्र.२ येथील दिनांक ०९.०४.२०२५ अन्वये समिती गठीत करण्यात आली होती. त्यानुंषगाने विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर विभाग यांच्या अध्यक्षतेखालील गठीत समितीने केलेल्या शिफारशीनुसार जिल्हा सैनिक मंडळ समिती व जिल्हा स्तरीय ध्वजदिन निधी संकलन समिती एकत्रित करुन पुनर्रचना करण्याची बाब विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

माजी सैनिकांच्या तक्रारी /अडचणीचे निवारण करण्यासाठी व माजी सैनिकांच्या पुनर्वसनाच्या विविध कल्याणकारी योजना राबविण्याकरता जिल्हा सैनिक मंडळ समिती व जिल्हा स्तरीय ध्वजदिन निधी संकलन समिती एकत्रित करुन पुढीलप्रमाणे पुनर्रचना करण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | जिल्हाधिकारी | - | अध्यक्ष |
| २) | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | - | सदस्य |
| ३) | जिल्हा अति. पोलिस अधीक्षक व /अथवा पोलीस व उप आयुक्त | - | सदस्य |
| ४) | जिल्हा उद्योग अधिकारी | - | सदस्य |
| ५) | जिल्हा शिक्षणाधिकारी | - | सदस्य |
| ६) | जिल्हा माहिती अधिकारी | - | सदस्य |
| ७) | जिल्हा शल्यचिकित्सक अथवा त्यांचेद्वारे नामनिर्देशित प्रतिनिधी | - | सदस्य |
| ८) | जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था अथवा त्यांचेद्वारे नामनिर्देशित प्रतिनिधी | - | सदस्य |
| ९) | जिल्हा प्रशासन अधिकारी (नगरविकास) जिल्हाधिकारी कार्यालय | - | सदस्य |
| १०) | जिल्हाधिकारी यांनी नामनिर्देशित केलेले ३ माजी सैनिक प्रतिनिधी | - | सदस्य |
| ११) | जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी | - | सदस्य सचिव |

३. वरील समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे असेल:-

**अ) माजी सैनिकांच्या तक्रारी / अडचणीचे निवारण करणे -**

१) जिल्ह्यातील माजी सैनिकांचे तक्रारीसाठी बैठका आयोजित करणे.

२) माजी सैनिकांच्या तक्रारीची दखल घेणे व तक्रारीचा निपटारा करणे.

३) माजी सैनिकांच्या कल्याणासाठी आवश्यक ते प्रयत्न करणे.

**ब) ध्वजदिन निधी संकलन नियोजन / समन्वय करणे-**

१) ध्वजदिन निधी ७ डिसेंबर ते पुढील वर्षाच्या ३० नोव्हेंबर पर्यत दिलेल्या इष्टांकानुसार निधी गोळा करावा.

२) जिल्हा समितीने ध्वजदिन निधी संकलनाचे नियोजन करावे.

३) संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे, संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी व जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी मागील वर्षीचे जिल्हानिहाय उद्दिष्ट, झालेले निधी संकलन, सदर निधीच्या अनुषंगाने जिल्हानिहाय लाभार्थी व लाभार्थी/प्रकरणनिहाय रक्कम वाटप यांचा तपशिल जिल्हाधिकारी व जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयांनी ठळकपणे त्या त्या ठिकाणी प्रसिध्द करावा.

४) राज्यातील जिल्हानिहाय लाभार्थ्यांचा सविस्तर तपशिल सैनिक कल्याण विभागाने त्यांच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करुन वेळोवेळी तो अद्ययावत करावा.

४. संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे यांनी ध्वजदिन निधीच्या लाभार्थ्यांचा सविस्तर जिल्हानिहाय वार्षिक तपशिल निश्चितपणे शासनास नोव्हेंबर अखरेपर्यंत पाठवावा.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५१२१५१७२४३८२७०७ असा आहे. हे शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by GANESH NIVRUTTI PAWAR
Date: 2025.12.15 17:26:46 +05'30'

**(गणेश पवार)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/सचिव,
३. मा.उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन)यांचे सचिव,
४. मा.उपमुख्यमंत्री (न.वि.वि.)यांचे सचिव,
५. मा. अध्यक्ष महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव,
६. मा. मंत्री, माजी सैनिकांचे कल्याण यांचे खाजगी सचिव,
७. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
८. मुख्य सचिवांचे स्वीय सहाय्यक,
९. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव
१०. सर्व विभागीय आयुक्त / सर्व जिल्हाधिकारी / सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
११. सर्व महापालिकांचे / नगरपालिका यांचे आयुक्त मुख्याधिकारी
१२. सर्व जिल्हा अति. पोलीस अधीक्षक व/ अथवा पोलीस व उप आयुक्त
१३. सर्व जिल्हा उद्योग अधिकारी.
१४. सर्व जिल्हा शिक्षणाधिकारी.
१५. सर्व जिल्हा माहिती अधिकारी.
१६. सर्व जिल्हा शल्यचिकित्सक अथवा त्यांचेद्वारे नामनिर्देशित प्रतिनिधी.
१७. सर्व जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी.
१८. सर्व जिल्हा प्रशासन अधिकारी (नगरविकास) जिल्हाधिकारी कार्यालय.
१९. सर्व जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था अथवा त्यांचेद्वारे नामनिर्देशित प्रतिनिधी.
२०. सर्व जिल्हाधिकारी यांनी नामनिर्देशित केलेले ३ माजी सैनिक प्रतिनिधी.
२१. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
२२. अधिदान व लेखा अधिकारी, महाराष्ट्र, मुंबई

२३. सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखाली कार्यालयातील सर्व विभाग प्रमुख आणि कार्यालय प्रमुख

२४. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई

२५. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

२६. संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे / संचालक, सैनिकी सेवापूर्व प्रशिक्षण संस्था, छत्रपती संभाजीनगर

२७. राज्य शासनाची सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक

२८. माहिती व जनसंपर्क महासंचालक (प्रसिध्दी पत्रक काढण्याच्या विनंतीसह)

२९. महालेखापाल, महाराष्ट्र -१, मुंबई महालेखापाल महाराष्ट्र-२, नागपूर

३०. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने

३१. निवडनस्ती (२ प्रती) (मासैक)